## न्यायनिर्णय

(अधिघोषित दिनांक ११.०३.२०२६)

**१.** अभिलेखावरील पुरावा पाहता आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असुन त्यावरील निष्कर्ष व कारणे खालीलप्रमाणे देण्यात आलीः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १०.०५.२०२२ रोजी १०.३० वाजताच्या दरम्यान ग्राम अळसणा, ता. शेगांव, जि. बुलडाणा येथे आरोपीची झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातुन ९० मिलीच्या ३८ नग देशी दारुच्या शिश्या किंमत अंदाजे ११४०/- रुपयाचा माल विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगुन असतांना मिळुन आला ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त केले.** |

## कारणमिमांसा

**२.** आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकारपक्षाने सा.क्र.१ दिनकर पहुरकर यांना नि.क्र.०६ खाली तपासले.

**मुद्दा क्र. १ करीताः–**

**३.** आरोपीने गुन्हा केला असे शाबीत करणे करीता सरकारपक्षास असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपी अवैध्यरित्या विनापरवाना ९० मीलीच्या ३८ नग देशी दारुच्या शिश्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेले पंच सा.क्र.१ दिनकर पहुरकर यांनी असे कथन केले की, ते आरोपीला

ओळखतात. पोलीसांनी त्यांना घटनास्थळ जप्ती पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नाही. पोलीसांनी त्यांची सही घेतली होती. त्यांच्या समक्ष आरोपीवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही व पंचनामा करण्यात आला नाही. त्यांनी पोलीसांनी सांगितलेल्या कागदावर सही केली होती. साक्षीदाराने घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील त्यांची सही असून त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे सांगीतले. वरील पंच साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याचा सविस्तर उलटतपास घेतला असता पोलीसांनी त्याचे समक्ष आरोपीवर छापा टाकुन आरोपीच्या ताब्यातुन ९० मीली च्या ३८ नग देशी दारुच्या शिश्या जप्त केल्याचे व तसा पंचनामा केल्याचे स्पष्टपणे नाकारले. तसेच सरकार पक्षास उपयुक्त अशी कोणतीही साक्ष दिली नाही.

४. प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केल्यावर असे दिसुन येते की, घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार फितुर झाल्यामुळे त्याचे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन ९० मीली च्या ३८ नग देशी दारुच्या शिश्या जप्त केल्याचे सिध्द झाले नाही. तसेच ज्यांनी जप्त नमुना रासायणीक तपासणीसाठी घेवुन गेले होते तो नमुना वाहक साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. यावरुन जप्त करण्यात आलेला नमुना ही देशी दारु होती व ती आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आली होती याबाबत कोणताही सशक्त पुरावा न्यायालयासमक्ष न आल्यामुळे आरोपीचे दोषारोप सिध्द होत नाही. अभियोग पक्षाच्या प्रकरणाबाबत साशंकता निर्माण होते व त्यामुळे निर्माण होणाऱ्या संशयाचा फायदा आरोपीस मिळणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करणेस उपयुक्त असा पुरावा दाखल झाला नसल्याने मुद्दा क्र.१ चे उत्तर मी ''नकारार्थी'' नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः–</u>**

५. वरील मुद्दयावरील चर्चा व त्यावरील निष्कर्ष पाहता सरकार पक्ष आरोपीविरुध्द दोष सिध्द करणेस असमर्थ ठरल्याने संशयाचा फायदा आरोपीच्या पक्षात जावुन तो निर्दोष सुटण्यास पात्र ठरतो. तसेच जप्त मुद्देमाल ९० मी.ली. ३८ नग देशी दारुच्या शिश्या अपील कालावधीनंतर संबंधीत राज्य उत्पादन कार्यालय यांचेकडे योग्य

त्या विल्हेवाटीसाठी पाठविणे योग्य होईल. करीता मुद्दा क्र.२ चे उत्तर मी खालील आदेशाप्रमाणे नोंदवित आहेः–

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी बशर शहा रहेमान शहा यांची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ड) च्या गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | अपील कालावधीनंतर जप्त करण्यात आलेला मुद्देमाल ९० मी.ली. ३८ नग देशी दारुच्या शिश्या नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे करीता संबंधीत राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडे पाठविण्यात याव्या. तसेच उर्वरीत मुददेमाल मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावी. |
| ४. | आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ४८१ प्रमाणे त्याचे रुपये १५,०००/– चे जामीन व बंधपत्र द्यावे. |

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.11 17:09:09 +0530

दिनांकः– ११.०३.२०२६

(श्रीमती एम. के. गोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट क्र.२, शेगांव.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– जी.डी.भोयटे, लघुलेखक ग्रेड–३.

न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, शेगांव.

दिनांकः–११.०३.२०२६